
# एप्रिल २०२५ चे राशी भविष्य- चैत्र महिना - शुक्ल व कृष्ण पक्ष

लेखक - अजय तनखीवाले




**पार्श्वभूमी :**

मीन राशीत सहा सहा ग्रह या महिन्यात असणार. बघूया ते काय गोंधळ घालणार आहेत.
मीनेत शनि-राहू युती, २९ मार्च ते १८ मे पर्यंत या काळात मोठे शापित योग आहेत, उत्तरेकडे युद्ध होण्याची शक्यता आहे.



**इतिहास:**

राहू-शनि एकत्र वृषभेत २००२ मध्ये होते तेंव्हा, गोधरा कांड सारखी मोठी घटना घडली. राहू शनि मकरेत १९९० मध्ये होते तेव्हा, सद्दाम हुसेन कुवेट वर चालून गेला. हीच युती १९६८ मध्ये होती, तेव्हा ४ एप्रिल ला मार्टिन लूथर किंगची आणि ५ जूनला रॉबर्ट केनेडीची हत्या झाली. अर्थिक स्लो डाउन झाले.
आता शनि राहू मीनेत २९ मार्च ते १८ मे पर्यंत आहे. या काळात महागाई वाढेल, कमी पाऊस होईल, दुष्काळ होईल, स्टॉक मार्केट पडेल, युद्ध व्हायची शक्यता वाढेल.
तसेच युरोप मध्ये अराजक होण्याची शक्यता आहे.
बऱ्याच ज्योतिष्य शास्त्री यांचे असे म्हणणे आहे की एक मोठे युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे. परंतु मला तसं वाटत नाही कारण शनि गंडांतरात आहे आणि त्याची शक्ती जवळपास शून्य आहे त्यामुळे फारसं काही होणार नाही असं मला वाटतं.

**उत्सव:** गुढी **पाडवा ३० मार्च, श्रीराम नवमी ६ एप्रिल, हनुमान जयंती १२ एप्रिल, ३० एप्रिलला अक्षय तृतीया.** पौर्णिमा- १२ एप्रिल, अमावास्या- २७ एप्रिल.


**महिन्यातील गोचर ग्रह**: २ एप्रिलला मंगळ कर्केत, १३ एप्रिलला रवी मेषेत.

एक एप्रिल रोजी: मीनेत रवी, बुद्ध, शुक्र, शनि, राहू, नेपचून, वृषभेत गुरु हर्षल, मंगळ कर्क राशीत केतू कन्येत.

| १ एप्रिल ची कुंडली | १५ एप्रिल ची कुंडली |
| --- | --- |
|   |   |

**२.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे वाचावे: (भारतीय पध्दती प्रमाणे वाचावे).**


काही लोकांना, विशेषता दक्षिणेकडील लोकांना, नक्षत्र माहित असते पण राशी माहीत नसते. दक्षिण भारतात नक्षात्रास “स्टार” म्हणतात. चंद्र राशी बरोबर नक्षत्र आणि चरण दिले आहे. तर आपली राशी किंवा नक्षत्र यापैकी जे माहिती असेल तो भाग वाचावा.

| राशी | भविष्य |
| --- | --- |
| २. १ मेष राशी (Mesh):<br> <br>अश्विनी, भरणी, कृत्तिका(१) | • ***<u>शनि- १२वा (अनिष्ट), गुरु-२रा,राहू-१२वा(अनिष्ट)</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>o या महिन्यात बरीच संकटे येणार.<br>o अनिष्ट शनि-राहू बाराव्या घरी असल्यामुळे तब्येतीवर विपरित परिणाम होणार.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>o उत्तरार्धातील मंगळाशी होणारे ग्रहयोग अपवादात्मक परिस्थितीतून चिंतेचे होणार.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>o पती व पत्नी विषयक सुवार्ता येणार.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>* |

| | | |
|---|---|---|
| | | o व्यावसायिक वसूली होणार.<br>• *इ. कौटुंबिक:*<br>o वक्री शुक्र भ्रमणामुळे, पूर्वार्धात घरात कार्य संपन्नपणे पार पडेल.<br>o भाऊबंदकीतून त्रास *होणार.*<br>*फ. परदेश गमन:*<br>o फारच कमी शक्यता दिसते.<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**ॐ ह्रीं श्रीं लक्ष्मी नारायणाय नमः ।।** |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br><br>कृत्तिका(२,३,४), रोहिणी, मृग (१,२) | | • ***शनि-११वा,गुरु-१ला,राहू-११वा***<br>• *अ. स्वास्थ्य:*<br>o अमावस्येजवळ प्रवासात स्वतःला जपा.<br>o पौर्णिमेजवळ दुखापती होण्याची शक्यता आहे.<br>• *ब. नोकरी/धंदा:*<br>o पौर्णिमेजवळ तरुणांना स्पर्धात्मक यश लाभेल.<br>o पूर्वार्ध वैयक्तिक मानसन्मानाचा असेल.<br>o कलाकारांचे भाग्योदय होतील.<br>o काहींना राजकीय लाभ मिळेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*<br>o गुरु-हर्षलच्या युतीमुळे उत्तम संबंध असणार.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:*<br>o बाकी पौर्णिमा वास्तुयोगाची म्हणावी लागेल.<br>o घर विकत घ्याल.<br>o शनि-राहू वित्त मामल्यात उत्तम योजना करणार.<br>• *इ. कौटुंबिक:*<br>o भावंडात थोडासा तणाव वाटेल.<br>o मुलांच्या अभ्यासात थोडी उदासीनता दिसेल.<br>o फारशी प्रगती होणार नाही.<br>• *फ. परदेश गमन:*<br>o शक्यता आहे, प्रयत्न चालू ठेवा.<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**ॐ गोपालाय उत्तर ध्वजाय नमः ।।** |


| | | |
|---|---|---|
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br><br><br>मृग(३,४), आर्द्रा, पुनर्वसु(१,२,३) | | • ***<u>शनि-१०वा,गुरु-१२वा(अनिष्ट),राहू-१०वा</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>  o गुरु हर्षलचे उत्तम परिणाम दिसतील.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>  o शुक्र-शनि युती योगाचे उत्तम पॅकेज अंमल करेल.<br>  o विशिष्ट सरकारी कामे होतील.<br>  o नोकरीत पगार वाढ होणार.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>  o थोडेसे गैरसमज होण्याची शक्यता.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>  o अमावस्या फसवणुकीची असणार.<br>  o जुगार सदृश्य व्यवहार टाळा.<br>  o उत्तरार्ध विचित्र खर्चाचा.<br>  o व्यवसायात उधार उसनवारी जपा.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>*<br>  o या महिन्यात भ्रातृचिंता असेल.<br>• *<u>फ. परदेश गमन:</u>*<br>  o नोकरीतून परदेशी जाल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**क्लीं कृष्णाय नमः ।।** |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br><br>पुनर्वसु(१), पुष्य, आश्लेषा | | • ***<u>शनि-९वा, गुरु-११वा,राहू-९वा</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>  o मंगळामुळे ज्वर, ताप होण्याची शक्यता आहे.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>  o तरुणांना नोकरीच्या संधी मिळतील.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>  o अमावस्येजवळ वादविवादाचे प्रसंग असतील.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>  o तुमचे सल्लागार व कॉम्प्युटरचे तंत्रज्ञ उत्तम योजना करणार.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>* |

<table>
<tr><td></td><td></td><td>o पूर्वार्ध कौटुंबिक पार्श्वभूमीवर सुवार्तेचा.<br>o नूतन वास्तु प्रवेश कराल.<br>• <u>*फ. परदेश गमन:*</u><br>o पौर्णिमेजवळ चैन करमणुकीचे योग.<br>o कलाकारांचे, खेळाडूंचे मोठे भाग्योदय परदेश गमन.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**हिरण्य गर्भाय अव्यक्त रूपिणे नमः ।।**</td></tr>
<tr><td>२. ५ सिंहराशी<br>(Simha):<br><br><br>मघा, पूर्वा, उत्तरा(१)</td><td></td><td>• <u>***शनि-८वा (अनिष्ट), गुरु-१०वा, राहू- ८वा(अनिष्ट)***</u><br>• <u>*अ. स्वास्थ्य:*</u><br>o मंगळामुळे उष्णतेचे आजार होण्याची शक्यता आहे.<br>o अनिष्ट शनि-राहू युती मुळे स्वास्थ्यावर परिणाम होऊ शकतील.<br>• <u>*ब. नोकरी/धंदा:*</u><br>o नोकरीतील अस्थिरता जाईल.<br>o मात्र उत्तरार्धात अनपेक्षित खर्चाचा.<br>• <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*</u><br>o अमावस्येजवळ स्त्रीचिंता कराल.<br>• <u>*ड. वित्त/ गुंतवणुका:*</u><br>o अतिशय संमिश्र ग्रहमान राहील.<br>o विशिष्ट जुन्या गुंतवणुकी फलद्रुप होतील.<br>• <u>*इ. कौटुंबिक:*</u><br>o घरातील कोणाच्या आजाराला किंवा शस्त्रक्रियेतून चिंतेचा.<br>o पुत्र चिंता जाईल.<br>• <u>*फ. परदेश गमन:*</u><br>o शक्यता कमी आहे.<br><br>*हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:*<br>**क्लीं ब्रह्मणे जगदाधाराय नमः ।।**</td></tr>
<tr><td>२. ६ कन्या राशी<br>(Kanya):</td><td></td><td>• <u>***शनि-७वा), गुरु-९वा, राहू-७वा***</u></td></tr>
</table>

| | |
|---|---|
| <br>उत्तरा(२,३,४), हस्त, चित्रा (१,२) | • *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>o थोडी उदासीनता वाढेल.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>o उत्तरार्धात मित्रमंडळींकडून फसगत होण्याची शक्यता.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>o शनि-राहू युती मुळे पतिपत्नीत बरेच गैरसमज होतील.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>o मोठे मजेदार ग्रहमान राहील.<br>o व्यवसायिक तेजी असेल.<br>o विशिष्ट कोर्ट प्रकरणे जिंकाल.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>*<br>o अमावस्या शारीरिक वेदना युक्त.<br>o जागरणाचे प्रसंग.<br>o पौर्णिमा अनेक माध्यमातून जल्लोषाची येतील.<br>o मात्र गर्भवती काळजी घ्यावी.<br>• *<u>फ. परदेश गमन:</u>*<br>o सल्लागार म्हणून परदेश गमन होईल.<br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा :<br>**ॐ नमो प्रीं पीताम्बराय नमः ।।** |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br>चित्रा(३,४), स्वाती, विशाखा (१,२,३) | • ***<u>शनि ६ वा (अनिष्ट), गुरु ८ वा(अनिष्ट) , राहू-६ वा (अनिष्ट)</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>o महिना आरोग्यविषयक पथ्य पाळण्याचा.<br>o पूर्वार्धात संसर्गजनक बाधा होण्याची शक्यता.<br>o अनिष्ट गुरु-हर्षलमुळे रुग्णालयात दाखल होण्याची पाळी येण्याची शक्यता आहे.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>o ओळखी मध्यस्थीतून लाभ होईल.<br>o उत्तरार्ध नोकरीत तणावाचा जाईल.<br>o कामावर आपली मत लोकांवर लादायचा प्रयत्न कराल.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>o अमावस्या कलहजन्य असेल. |

| | |
|---|---|
| | • *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>   o शुक्र-शनि युती योगातून, पूर्वार्धात आर्थिक कोंडी सुटेल.<br>   o शनि-राहू युती मुळे, कोर्टात तुमच्या विरुद्ध निर्णय लागतील.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>*<br>   o पुत्र चिंता जाईल.<br>• *<u>फ. परदेश गमन:</u>*<br>   o शक्यता कमी आहे.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा :<br>**तत्त्व निरंजनाय तारकरामाय नमः ।।** |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br><br>विशाखा(४), अनुराधा, ज्येष्ठा | • ***<u>शनि-५ वा, गुरु-७वा,राहू-५वा</u>***<br><br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>   o उत्तरार्धात आरोग्य विषयक पथ्य पाळा.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>   o शुक्र आणि मंगळ यांचे भ्रमणे, पुर्वार्धात मोठी उमेद निर्माण करणारे ठरतील.<br>   o पुर्वार्धात मनासारखी कामे होतील. माणसांचे सहकार्य लाभेल.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>   o वैवाहिक जीवन आनंदमय होईल.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>   o शनि-राहूच्या युतीमुळे आर्थिक योजनेवर परिणाम होतील.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>*<br>   o पौर्णिमेजवळ प्रिय व्यक्तींचे भाग्योदय होतील.<br>• *<u>फ. परदेश गमन:</u>*<br>   o परदेशी नक्कीच जाल.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**नारायणाय सुरसिंहाय नमः ।।** |

| | |
|---|---|
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br><br><br>मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा(१) | • ***<u>शनि-४था , गुरु-६वा(अनिष्ठ),राहू-४था</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>    o अनिष्ट गुरु-हर्षल युतीमुळे जुन्या व्याधी त्रासदायक होतील.<br>    o तर अनिष्ट मंगळामुळे हॉस्पिटल बघण्याची वेळ येईल.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>    o नोकरीत प्रसन्न वातावरण राहील.<br>    o व्यावसायिक विशिष्ट करार मदार होतील.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>    o पूर्वार्ध बुध-शुक्रांच्या भ्रमणातून, मानसिक प्रसन्नता देणारा ठरेल.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>*<br>    o उत्तरार्धात ग्रहमान नैसर्गिक पाठबळ न देणारे ठरेल.<br>    o अमावस्या बेरंगाची असेल.<br>    o पारंपरिक घराची डागडुजी करावी लागेल.<br>• *<u>इ. कौटुंबिक:</u>*<br>    o पौर्णिमेजवळ वैयक्तिक सुवार्ता मिळणार.<br>• *<u>फ. परदेश गमन:</u>*<br>    o या महिन्यात परदेश गमनाची शक्यता कमी आहे.<br><br>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>**ॐ श्रीं देवकृष्णाय रूज़ख़्ताय नमः ॥** |
| २. १० मकर राशी (Makar):<br><br><br>उत्तराषाढा(२,३,४), श्रवण, धनिष्ठा(१,२) | • ***<u>शनि-३रा, गुरु-५वा,राहु-३रा</u>***<br>• *<u>अ. स्वास्थ्य:</u>*<br>    o या महिन्यात स्वास्थ्य उत्तम असेल, ते तसेच ठेवा.<br>• *<u>ब. नोकरी/धंदा:</u>*<br>    o नोकरदारांना नोकरीत सुखदायक लाभ होईल.<br>    o उत्तरार्धात व्यावसायिक कामगार पीडा होण्याची शक्यता आहे.<br>• *<u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>*<br>    o थोडा कलह वाढेल पण तुम्ही सांभाळून घ्याल.<br>• *<u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>* |

| | | |
|---|---|---|
| | | ○ शुक्र-शनि युती योगाने, व्यवसायात आर्थिक ओघ राहील.<br>○ मोठी सरकारी कामे गुरुभ्रमणामुळे साधतील.<br>○ पौर्णिमेजवळ वैयक्तिक सुवर्तांचा भर असेल.<br>• *इ. कौटुंबिक:*<br>○ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न संपतील.<br>○ शनि-राहू युती मुळे भावंडात तणाव दिसेल.<br>• *फ. परदेश गमन:*<br>○ शक्यता आहे, पण मेहेनत करावी लागेल.<br><br>**हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:**<br>**ॐ श्रीं वत्सलाय नमः ॥** |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br>धनिष्ठा(३,४), शततारका, पूर्वाभाद्रपदा (१,२,३) | | • ***शनि-२ला, गुरु- ४था, राहू- २रा***<br>• *अ. स्वास्थ्य:*<br>○ उत्तरार्धात आरोग्य विषयक पथ्य पाळा.<br>○ दुखापती जपा.<br>• *ब. नोकरी/धंदा:*<br>○ पौर्णिमेजवळ मोठ्या सुवार्ता मिळतील.<br>○ घरातील प्रिय व्यक्तींच्या चिंता जातील.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:*<br>○ *सर्व मतभेद मिटतील. आनंदाचे दिवस येतील.*<br>• *ड. वित्त/ गुंतवणुका:*<br>○ पूर्वार्धात बुध-शुक्र आणि गुरु यांची भ्रमणे इच्छापूर्तीच्या बातम्या पुरवणारी ठरतील.<br>○ व्यावसायिक आर्थिक कोंडी फुटेल.<br>• *इ. कौटुंबिक:*<br>○ आईचे स्वास्थ्य उत्तम असेल.<br>○ तुम्ही भावंडांचे लाडके पुढारी ठराल.<br>• *फ. परदेश गमन:*<br>○ तुम्हाला परदेशी बोलावून तुमचा आदरसत्कार होईल. |

<table>
<tr><td></td><td>हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br><br>ॐ श्रीं उपेन्द्राय अच्युताय नमः ।।</td></tr>
<tr><td>२.१२ मीन राशी (Meena):<br>पूर्वाभाद्रपदा (४), उत्तराभाद्रपदा, रेवती<br>Pisces</td><td>
<ul>
<li><u>शनि-१ला, , गुरु-३रा, राहू-१ला</u></li>
<li><u>अ. स्वास्थ्य:</u>
<ul><li>शनि-राहू युतीमुळे स्वास्थ बिघडेल.</li></ul></li>
<li><u>ब. नोकरी/धंदा:</u>
<ul><li>मीनेतले शुक्र भ्रमण साडेसातीतही उत्तम फळे देईल.</li>
<li>तरुणांचे नैराश्य जाईल.</li>
<li>सरकारी माध्यमातून लाभ होईल.</li></ul></li>
<li><u>क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे:</u>
<ul><li>नवपरिणितांचे, नवविवाहितांचे भाग्योदय होतील.</li>
<li>पती व पत्नींचा उत्कर्ष होईल.</li></ul></li>
<li><u>ड. वित्त/ गुंतवणुका:</u>
<ul><li>पौर्णिमेजवळ आर्थिक कोंडी फुटेल.</li>
<li>वित्त व्यवसाय सुधारेल.</li></ul></li>
<li><u>इ. कौटुंबिक:</u>
<ul><li>उत्तरार्धही प्रारंभी शुभ ग्रहांचा असेल.</li>
<li>या काळात शुभ ग्रह उत्तम साथ देतील.</li>
<li>कोर्ट प्रकरणे सुटतील.</li></ul></li>
<li><u>फ. परदेश गमन:</u>
<ul><li>शक्यता कमी आहे आणि कठिणच दिसतेय.</li></ul></li>
</ul>
हा राशी मंत्र रोज ११ वेळा म्हणावा:<br>ॐ क्लीं उद्धृताय उद्धारिणे नमः ।।</td></tr>
</table>